

## रयत शिक्षण संस्थेचे

# आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज रामानंदनगर (बुर्ली)

## कर्मवीर जयंती स्पर्धा अहवाल  दिनांक 22 सप्टेंबर 2019

132 व्या कर्मवीर जयंती सोहळा निमित्त महाविद्यालयात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. यानिमित्ताने विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्याच्या दृष्टीने कर्मवीर सप्ताह साजरा करण्यात आला. त्यात एकूण उल्लेखनीय नऊ स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये पाक कला स्पर्धा घेऊन तज्ञ परीक्षकांकडून परीक्षण करण्यात आले. त्यावर अभिप्राय देण्यात आला. त्यामुळे विद्यार्थिनींमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.तसेच रांगोळी स्पर्धा, मेहंदी स्पर्धा आणि पुष्परचना स्पर्धा घेऊन विद्यार्थिनींना प्रोत्साहन देण्यात आले.

याबरोबरच इतर स्पर्धांचे आयोजन करताना महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनी या दोघांनाही डोळ्यासमोर ठेवून त्यांच्या चैतन्य निर्माण व्हावे व त्यातून कला सादर करण्याची संधी मिळावी या हेतूने पुढील स्पर्धा घेण्यात आल्या. काव्यवाचन स्पर्धा, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, हस्तलेखन स्पर्धा आणि गीत गायन स्पर्धा घेऊन विद्यार्थ्यांमध्ये खेळीमेळीचे वातावरण तयार व्हावे व सभाधीटपणा यावा या हेतूने स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. त्यातून या सर्व परदेशी स्पर्धकांचे गुणात्मक व कलात्मक मूल्यमापन करून गुणानुक्रमे प्रथम द्वितीय आणि तृतीय क्रमांक काढण्यात आले व पारितोषिक वितरण निमित्त प्रमाणपत्र देऊन त्यांचा गुणगौरव करण्यात आला.

माननीय प्राचार्य डॉ.एल.डी.कदम साहेब यांनी मार्गदर्शन करून प्रेरणा व प्रोत्साहन दिले. तर स्पर्धा कमिटीचे सर्व चेअरमन  व सदस्य यांनी परिश्रम घेऊन स्पर्धा यशस्वी पार पाडल्या.

निष्पत्ती:1. विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळाला.

२.  विद्यार्थ्यांना अंतर्मुख होता आले

लाभार्थी :महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी आणि शिक्षक





कर्मवीर जयंती निमित्त पाककला स्पर्धेतील सहभागी स्पर्धक तसेच खाद्यापदार्थांची माहिती घेत असताना महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.व्ही.बी.पाटील





स्पर्धेतील सहभागी स्पर्धक स्पर्धेविषयी माहिती देताना

प्रा. प्रतिभा पुदाले
चेअरमन,
सांस्कृतिक विभाग

प्राचार्य,
आर्टस, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज रामानंदनगर (बुर्ली)